वादीकरीता सा.क्र.४

**<u>प्रतिवादी क्र.१ व २ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.यु.एस.जाधव यांच्या वतीने शपथेवर सुरू</u>**

१. माझ्या मुलाचे नाव शशांक असे आहे, शशांत असे नाही. आमच्या कासार शि. या गावी शशांत शामराव मुळजकर या नावचा ईतर व्यक्ती नाही. माझ्या पत्नी नामे सुरेखा म्हणजे शशांकच्या आई सद्या हयात नाहीत. मी या दाव्यातील प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या विरूध्द रक्कम रू.८,५०,०००/- बाबत दि.दावा क्र.२२६/२०१६ हा दाखल केला होता. तो दावा दि.०८/०९/२०१७ रोजी नामंजूर झाला हे म्हणणे खरे आहे. नि.दि.दावा क्र.२२६/२०१६ मध्ये दि.२५/०३/२०१४ रोजी रू.७,००,०००/-, दि.११/०६/२०१४ रोजी रू.३०,०००/-, दि.१६/०३/२०१५ रोजी रू.२०,०००/- आणि दि.०४/११/२०१५ रोजी रू.१,००,०००/- असे या दाव्यातील प्रतिवादी क्र.१ व २ यांना मी दिले होते म्हणून कथन केले होते. मी या दाव्यातील प्रतिवादी क्र.१ व २ यांना रू.८,५०,०००/- ही राजेंद्र लक्ष्मण बंडगर यांना माझ्या विक्री केलेल्या जमीनीच्या मोबदल्यातून दिली होती. राजेंद्र लक्ष्मण बंडगर यांचे खरेदीखत दि.१९/०३/२०१४ रोजी झाले होते. त्या खरेदीखतात नमूद असलेली रक्कम रू.७,८१,०००/- ही मी मराठवाडा ग्रामीण बँक शाखा, कासार शि. येथे जमा केली होती हे म्हणणे खरे आहे. नि.दि.दावा क्र.२२६/२०१६ मधील न्यायनिर्णयाविरूध्द मी कसलेच अपील केले नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी माझी रू.८,५०,०००/- ची फसवणूक केली होती म्हणून त्यांच्या विरूध्द मी नि.फौ.ख क्र.२४/२०१६ दाखल केला होता हे म्हणणे खरे आहे. नि.फौ.ख क्र.२४/२०१६ हा तजवीजी अभावी खारीज झाला हे म्हणणे खरे आहे. नि.फौ.ख क्र.२४/२०१६ मधील खारीज आदेशाविरूध्द मी कसलेच अपील केले नाही. माझा मुलगा शशांक यांनी देखील नि.फौ.ख क्र.१७/२०१६ हा भा.द.वि. चे कलम ४२०, ४२७ वगैरे कलमांतर्गत त्याची रू.११,००,०००/- चा धनादेश देवून फसवणूक केली म्हणून प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या विरूध्द दाखल केला होता हे म्हणणे खरे आहे. नि.फौ.ख क्र.१७/२०१६ दि.२४/०९/२०२१ रोजी खारीज

झाल्याचे मला माहित नाही. मी व माझा मुलगा शशांक एकत्र राहतो. शशांक यांनी मला त्याने दाखल केलेल्या फौजदारी कार्यवाहीबाबत काहीही सांगितलेले नाही. माझा मुलगा शशांक हा दि.०५/०७/२०२४ रोजी मयत झाला हे म्हणणे खरे आहे. राजेंद्र बंडगर शिवाय ईतरांना आम्ही सन-२०१३ ते सन-२०१५ दरम्यान ईतर कोणतीही मिळकत विक्री केलेली नाही. मी प्रतिवादींना रक्कमा दिल्या हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. रू.८,५०,०००/- च्या वसूलीसाठी मी दावा दाखल केला होता. तो खारीज झाला. मला प्रतिवादींकडून रू.८,५०,०००/- अद्याप मिळालेले नाहीत.

२. माझा मुलगा शशांक व प्रतिवादी क्र.१ विजयकुमार यांची सुरूवाती पासूनच मैत्री होती. प्रतिवादी क्र.१ विजयकुमार यांचे लग्न केव्हा झाले हे मला माहित नाही. प्रतिवादी क्र.३ विरभद्र शिंगारे यांना एक मुलगा व चार मुली आहेत. प्रतिवादी क्र.३ विरभद्र शिंगारे हे सुमारे ५ ते ६ वर्षांपूर्वी मयत झाले.

**प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून उलट तपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.09.02 16:25:57 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक ०२/०९/२०२५.